**ठळक बातम्या**

- महात्मा ज्योतिबा फुले यांच्या गावी जिल्हा परिषदेच्या पहिल्या सीबीएसई शाळेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- शालेय बसचे शुल्क प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून निश्चित करण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव

**आणि**

- नवी दिल्लीत 'ग्रंथदिंडी'ने महिला शासकीय अधिकारी साहित्य संमेलनाला सुरुवात

**<><><><><><>**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुणे जिल्ह्यातल्या त्यांच्या खानवडी गावी अभिनव जिल्हा परिषद शाळा सुरु करणे ही त्यांच्या कार्याला खरी मानवंदना ठरेल असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज म्हटलं. पुण्यात खानवडी इथे ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळेचं उद्घाटन केल्यावर ते बोलत होते. सीबीएसई अभ्यासक्रमावरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातली पहिली जिल्हा परिषद शाळा आहे. पुढील वर्षापर्यंत इथं २८० विद्यार्थ्यी क्षमतेचे वसतिगृह पूर्ण होणार आहे. पुणे जिल्हा परिषदेकडून 100 शाळांमध्ये 100 अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यात आल्या आहेत. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. भविष्यात अशी एक हजार केंद्रे उभारण्यात येतील असे फडणवीस यांनी सांगितले. २०२९ पासून लोकसभा आणि विधानसभेत 33 टक्के आरक्षण देण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्री-शिक्षण आणि

महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचं फडणवीस म्हणाले.

**होल्ड.. बाईट - फडणवीस**

**<><><><><><>**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त देशभरात त्यांना आदरांजली वाहण्यात आली. याविषयीचा अधिक वृत्तांत आता ऐकूया …

**व्हीसी**

(संसद भवनात प्रेरणा स्थळी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य मान्यवरांनी फुले यांना आदरांजली वाहिली. मुंबईत लोकभवन इथं राज्यपालांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षात शालेय शिक्षण विभाग राज्यातल्या सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजवण्यासाठी शाळांमध्ये वाचनालयं ज्ञानकेंद्र म्हणून विकसित केली जाणार आहेत. तसेच फुले यांच्या विचारांवर आधारित व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचं आयोजन करण्यात येणार आहे.

महात्मा फुले यांच्या जयंती निमित्ताने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पुण्यातल्या महात्मा फुले वाड्याला भेट देवून अभिवादन केलं. २०२६ या संपूर्ण वर्षभरात विविध उपक्रम आणि सत्यशोधक विचारांचा जागर करण्याची विशेष मोहीम काँग्रेस राज्यभर राबवणार आहे. यासाठी पक्षानं महात्मा फुले उत्सव समिती स्थापन केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. राज्यभरातही महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. )

**<><><><><><>**

प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून आता शालेय बसचे शुल्क निश्चित केलं जाणार आहे. नव्या मोटार वाहन कायद्याच्या अंतर्गत परिवहन विभागानं शालेय बस नियमनाच्या संदर्भात नियमावली जाहीर केली आहे. त्यानुसार पालकांकडून केवळ मासिक शुल्क घेतलं जाईल, एकरकमी आगाऊ रक्कम घेता येणार नाही. या नियमांच्यासंदर्भात अधिक जाणून घेऊ, आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*नव्या नियमांनुसार बसमध्ये विद्यार्थी किती वाजता आला आणि किती वाजता उतरला या वेळेसह त्याची दैनिक उपस्थिती नोंद बंधनकारक करण्यात आली आहे. तसंच पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनात महिला परिचारिका आवश्यक असणार आहे.*

*विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणं आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग पालकांना करता येईल. याशिवाय पॅनिक बटण, अग्निसुरक्षा यंत्रणा, CCTV तसेच सर्व सीट्ससाठी सीट बेल्ट सक्तीचे आहेत. बस चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र देणं ही सरकारनं अनिवार्य केलं आहे.*

*आता प्रत्येक शाळेत परिवहन समिती कार्यरत असेल आणि भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी पालकांच्या तक्रारींचे निवारण समितीच्या माध्यमातून होईल. शिक्षण आणि परिवहन विभाग संयुक्तपणे शालेय वाहतुकीची नियमित तपासणी करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील. नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.*

**<><><><><>**

दिल्लीत छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या 351 व्या जयंतीनिमित्त पहिल्या महिला शासकीय अधिकारी साहित्य संमेलनाची आज उत्साहात सुरुवात झाली. ‘सरहद, पुणे’ आणि मराठी भाषा विभागाच्या संयुक्त विद्यमानं हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

भव्य ग्रंथदिंडी काढून संमेलनाची सुरुवात करण्यात आली. संमेलनाध्यक्ष लीना मेहंदळे यांनी प्रशासनात काम करताना समाजात बदल घडवणं हीच खरी लोकसेवा असल्याचं सांगितलं. माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनीही कामाच्या ताणात साहित्याचा आधार मिळतो, असं सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र शासनाने विविध कामगार कायद्यांचे एकत्रीकरण करून त्याच रूपांतर चार कामगार संहितांमध्ये केले असून, यामुळे कामगार कायदे अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावी होणार आहेत, असं कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी म्हटलं आहे. राज्य शासनाच्या औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयाने आयोजित केलेल्या “नारायण मेघाजी लोखंडे व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य पुरस्कार २०२५” वितरण प्रसंगी ते बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी आज मुंबईत एन एफ डी सी अर्थात राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाला भेट देत इथल्या कामांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी भारतीय राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला भेट दिली. चंचल कुमार यांनी आय आय सी टी मधल्या सुविधांचाही यावेळी आढावा घेतला.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात सिन्नर तालुक्याच्या पूर्व भागात पंचाळे-शहा रस्त्यावर काल मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमाराला ट्रक आणि पिकअप यांच्यात जोरदार धडक होऊन पिकअप कारनं पेट घेतल्यानं चार जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिलांचा समावेश आहे.

<><><><><>

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर बसस्थानकात बस मागं घेताना झालेल्या अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी चालक आणि वाहकाला ताब्यात घेतलं असून पुढील तपास सुरू आहे.

<><><><><>

मुंबईत भांडुप पश्चिम भागात आज सकाळी घराचा काही भाग कोसळून झालेल्या अपघातात एका वृद्धाचा मृत्यू झाला आहे.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या कृषी सेवा केंद्रांच्या तपासणीत अनेक बनावट खते, बियाणे आणि कीटकनाशकांचे नमुने जप्त केले आहेत. एका बियाणे कंपनीविरोधात न्यायालयात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर दोन खत कंपन्यांविरोधात पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले असून, ३०५ मेट्रिक टन खताचा साठा जप्त केला आहे.  जिल्हा प्रशासनाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र हवामान कोरडे राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. याकाळात विदर्भ आणि लगतच्या मराठवाड्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे,

दरम्यान, आज सोलापूरात तापमान ४१ पूर्णांक ४ दशांश सेल्सिअस एवढे होते.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज पंजाब किंग्सविरुद्ध सनराइजर्स हैदराबाद सुरु असलेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना सनराइजर्स हैदराबादनं निर्धारित २० षटकांत ६ बाद २१९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल पंजाब किंग्सनं सामन्याचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा १७ षटकांत ४ बाद २०२ धावा केल्या होत्या.

आजचा दुसरा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये होणार आहेत. यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. हा सामना चेन्नईमध्ये एम ए चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

**//<><><><><><>//**